मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शुक्रवार, दि. 16 मे 2025 | पान- 1

# चिखली-कुदळवाडीची प्रस्तावित टीपी स्कीम अखेर रद्द!

## महानगरपालिका सर्वसाधारण सभेत प्रस्तावाला मंजुरी : आमदार लांडगे यांच्या मागणीला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने मौजे चिखली- कुदळवाडीतील प्रस्तावित TP SCHEME कार्यवाही रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत प्रशासनाने महापालिका सर्वसाधारण सभेत मंजुरी दिली. त्यामुळे भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश मिळाले असून, ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांना दिलासा मिळाला आहे.

चिखली, चऱ्होली येथील प्रस्तावित 'टीपी स्कीम' बाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक केली होती. त्यावेळी प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. आज दि. 15 मे 2025 रोजी प्रशासनाने सर्वसाधारण सभेत सभेला मान्यता दिली आहे.



आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या भूमिपुत्रांच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे या भागात टीपी स्कीम लागू नये, अशी आग्रही भूमिका प्रशासनासमोर मांडली. त्याला यश मिळाले आहे.

### चऱ्होलीबाबत भूमिपुत्रांसाठी लढणार!

मौजे चिखलीतील प्रस्तावित TP SCHEME प्रशासनाने रद्द केली. मात्र, अद्याप मौजे चऱ्होलीतील प्रस्तावित TP SCHEME बाबत निर्णय झालेला नाही. याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह ग्रामस्थ, भूमिपुत्र यांची बाजू ऐकूण घेणार आहेत. त्यासाठी आयुक्त- ग्रामस्थ यांची श्री वाघेश्वर महाराज मंदिरात लवकरच बैठक घेण्यात येईल. भूमिपुत्रांचा TP SCHEME ला का विरोध आहे? याबाबत सर्वसमावेशक चर्चा करण्यात येईल. स्थानिक नागरिकांना विश्वासात घेवूनच निर्णय घेण्यात येईल, अशी प्रशासनाची भूमिका आहे. मात्र, चऱ्होलीची TP SCHEME सुद्धा चिखली-कुदळवाडीप्रमाणे रद्द करावी, अशी आमची ठाम मागणी आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> “ चिखली-कुदळवाडीचा TP Scheme रद्द करण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांचे आभार व्यक्त करतो. याबाबत सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. याच धर्तीवर आता चऱ्होलीची TP Scheme संदर्भातील प्रक्रियाही रद्द करावी. कारण, भूमिपुत्रांचा या स्कीमला विरोध आहे. संपूर्ण शहराचा सुधारित विकास आराखडा (DP) आगामी तीन महिन्यांत अंतिम होईल. त्यामुळे चऱ्होलीसाठी नवीन TP Scheme आवश्यकता नाही, अशी माझी भूमिका आहे. लोकप्रतिनिधी म्हणून स्थानिक, जागामालक, ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी मी कटिबद्ध आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# नदी सुधार प्रकल्प आराखड्यात होणार सुधारणा!

## पर्यावरण प्रेमींच्या मागणीला मोठे यश : आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील मुळा, पवना आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाच्या आराखड्यामध्ये सुशोभिकरणावर भर देण्यापेक्षा प्रदूषण होणार नाही, अशा प्रकल्पांचा समावेश करावा. यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पर्यावरण प्रेमी आणि स्वयंसेवी संस्था- संघटनांच्या मागणीला मोठे यश मिळाले आहे.

नदी प्रदूषण आणि महानगरपालिकेचा नदी सुधार प्रकल्पातील त्रुटी याबाबत पुणे व पिंपरी-चिंचवडमधील पर्यावरण प्रेमी आणि स्वयंसेवी संस्था-संघटनांनी गेल्या दोन महिन्यांपासून आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान, पर्यावरण प्रेमींनी सूचवलेले मुद्दे रास्त असून, त्याचा अंतर्भात नदी सुधार प्रकल्पामध्ये करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका प्रशासनाला केली होती. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

पिंपरी-चिंचवड मनपा हद्दीतील इंद्रायणी नदीचे होणारे प्रदूषण कमी करणे करिता मनपामार्फत इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा



आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याला राज्य शासनाच्या अमृत योजनेतून निधी उपलब्ध होणार आहे. त्या करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तांत्रित मान्यताही घेण्यात आली आहे.

तथापि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पामध्ये पर्यावरण प्रेमी व विविध स्वयंसेवी संस्था संघटनांनी केलेल्या सूचनांचा समोवश करण्याची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या कामामध्ये अमृत योजना मार्गदर्शनानुसार, आवश्यक त्या सुधारणा करुन प्रकल्पाचा सुधारित आराखडा तयार करण्यात येत आहे. सदर प्रकल्पाची प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठवण्यात येणार आहे, असे लेखी पत्राद्वारे महानगरपालिका पर्यावरण विभागाने आमदार महेश लांडगे यांना कळवले आहे.

### पिंपळे निलख येथील कामाला स्थगिती..!

दरम्यान, पिंपळे निखल येथे पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत मुळा नदी पुनरूज्जीवन प्रकल्पांतर्गत पुणे महापालिकेसोबत संयुक्तपणे वाकड बायपास ते सांगवी पुलापर्यंत (टप्पा- 1) नदी प्रदूषण कुमी करणे व पूर नियंत्रण विषयक काम सुरू होते. पिंपळे निलख स्मशानभूमीजवळ सुरू असलेल्या या कामाला पर्यावरण प्रेमी आणि स्वयंसेवी संस्था-संघटनांच्या प्रतिनिधी विरोध केला होता. या तक्रारींची दखल घेतली जाणार असून, या ठिकाणाच्या कामाचा फेरविचार करण्यासाठी तांत्रिक सल्ला घेण्यात येत आहे. त्यामुळे सदर कामाला तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.

# टँकरचालकांनी जादा शुल्क आकारू नये

## पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांची टँकरचालकांना तंबी

**पुणे | प्रतिनिधी**

'टँकरने पाणी देताना नागरिकांकडून जादा शुल्क आकारू नका,' अशी तंबी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी टँकरचालकांना बुधवारी दिली. टँकरचालकांनी जादा पैशांची मागणी केल्यास महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे तक्रार करा, असे आवाहन आयुक्तांनी केले.गेल्या काही दिवसांपासून शहरात पाण्याच्या टँकरची मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी बुधवारी महापालिकेत टँकर चालक-मालक असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत नागरिकांना वेठीस धरून टँकरसाठी वाढीव दर आकारू नये, अशा सूचना आयुक्तांनी केल्या.

या बैठकीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून टँकर भरून घेऊन नागरिकांना पोहोचविण्यासाठी निश्चित किती खर्च येतो, याची माहिती घेण्यात आली. टँकर भरण्याचे ठिकाण आणि ज्या ठिकाणांवरून टँकरची मागणी झाली आहे, त्यामधील अंतर यावर टँकरचे दर घेतले जातात. नागरिकांची पाण्याची गरज लक्षात घेता विनाकारण दर आकारू नका, अशा सूचना देण्यात आल्याचे आयुक्त डॉ. भोसले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.




ज्या भागात महापालिकेला पाणी देता येत नाही तेथे महापालिकेच्या वतीने टँकरद्वारे मोफत पाणी दिले जाते. आंबेगाव बुद्रुक, नऱ्हे, खराडी या भागांतून टँकरसाठी पैसे मागितले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. याची दखल घेऊन संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशाराही महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी दिला. मात्र, टँकरचालक नागरिकांकडे पैसे मागत असल्याच्या काही तक्रारी समोर आल्या आहेत. जे टँकरचालक नागरिकांकडून पैसे मागतील त्यांची तक्रार पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे करावी. शहरातील टँकरची मागणी आणि त्यासाठी घेतले जाणारे शुल्क याचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### 'विहीर तसेच बोअरवेलमधून स्वच्छ पाणी द्या'

» महापालिकेच्या टँकर भरणा केंद्राबरोबरच बोअरवेल तसेच विहिरीमधून पाणी भरून ते टँकरद्वारे पोहोचवले जाते. हे पाणी देताना ते शुद्ध असेल, याची खात्री संबंधित टँकरचालकांनी आणि मालकांनी करून त्यानंतरच त्याचे वितरण नागरिकांना करावे, अशी सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी केली. पाणीपुरवठा करताना त्यामध्ये आवश्यक प्रमाणात क्लोरिन टाकण्याच्या सूचनाही भोसले यांनी दिल्या.

# पुणेकरांच्या पीएमपीचा बसप्रवास महागला

## दैनिक पास 40 रुपये आणि मासिक पास 900 नवीन रुपये असलेले दोन्ही पासेस रद्द

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) प्रवाशांसाठी बससेवा पुरविण्यात येते. राज्य शासनाच्या २० डिसेंबर २००५ रोजीच्या पत्रास अनुसरून यापूर्वी परिवहन महामंडळाने २० डिसेंबर २०१४ पासून प्रवासी तिकीट दरवाढ केली होती. यामध्ये १ ते ७८ किलोमीटरसाठी २ किमीच्या अंतराने १ ते ४० पर्यंत स्टेज रचना निश्चित करून दर आकारणी करण्यात येत होते. आता त्यात बदल करून ११ स्टेज करण्यात आले असून, त्यामुळे पीएमपीच्या तिकीट दरात भरघोस वाढ केली आहे.

परिवहन महामंडळाच्या बस संचलनामध्ये व प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सुसूत्रता होण्यासाठी राज्य शासनाच्या ३१ मार्च २०१८ रोजीच्या पत्रानुसार विद्यमान भाडेप्रणालीमध्ये बदल करून १ ते ३० किमी अंतरासाठी ५ किमीच्या अंतराने ६ स्टेज व त्यापुढे ३० ते ८० किमी अंतरासाठी १० किमीच्या अंतराने ५ स्टेज असे एकूण ११ स्टेज रचनेत किलोमीटर आधारित सहरचना करण्यात आली आहे.

प्रचलित स्टेज रचनेचे प्रवासभाडे एकूण अंतरासाठी प्रमाणबद्ध किमीमध्ये सहरचना केल्याने पीएमपीएमएल आणि पुणे महामेट्रो सेवेचे एकत्रीकरणाची योजना सुसंगत करणे सोईस्कर, ई-तिकिट प्रणाली व नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड यामध्ये सुसंगतता, प्रवासभाडे दर अचूक, प्रवाशांना व सेवकांना समजण्यास सोपी व प्रवाशांच्या खर्चाच्या अधिक न्याय्य वितरण सुनिश्चित होणार आहे.




### पासेसच्या दरामध्ये फेरबदल

» तिकिट दर फेररचनेमुळे पासमध्ये बदल करण्यात येणार आहे. त्यानुसार बदल प्रस्तावित केला आहे. यामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड मनपा हद्दीसाठी प्रचलित असलेल्या दैनिक पास ४० रुपये (एक मनपा हद्दीसाठी) आणि मासिक पास ९०० रुपये (एक मनपा हद्दीसाठी) असलेले दोन्ही पासेस रद्द करून दोन्ही मनपा हद्दीसाठी एकच दैनिक पास ७० रुपये व मासिक पास १,५०० रुपये इतका करण्यात आलेला आहे. तर पीएमआरडीए हद्दीसाठी दैनिक पास १२० रुपयांऐवजी १५० रुपये इतका करण्यात आलेला आहे. मात्र, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगचे पास व पीएमआरडीएच्या मासिक पासमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

### कंत्राटी सेवक घेण्यासही मान्यता

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड यांच्या स्वामित्व हिश्शानुसार ५०० नवीन स्वमालकीच्या सीएनजी बसेस उपलब्ध करून देण्यास तसेच महामंडळाच्या सेवकांच्या वेतनावरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीने बाह्य संस्थेकडून कंत्राटी पद्धतीने आवश्यक सेवक घेण्यासही संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार परिवहन महामंडळाकडून लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

# पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने टाकली कात

## मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती आराखड्यामुळे कार्यालये अन् ठाण्यांनी पालटले रूपडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या सात कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी पूर्णत्वास आली असून, राज्यभरात पोलिस यंत्रणेत मोठा बदल घडून आला आहे. याअंतर्गत शासकीय कार्यालये, विशेषतः पोलिस ठाणे अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनवण्यावर भर देण्यात आला होता. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने या मोहिमेत जोमाने सहभाग घेतला. ज्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यालये आणि पोलिस ठाण्यांचे रूपडे पालटले आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत मात्र पिंपरी-चिंचवडला यश हुलकावणी देऊन गेले असले तरीही आयुक्तालयात झालेल्या सकारात्मक बदलांची दखल राज्यस्तरावर घेतली गेली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कार्यालये आणि पोलिस ठाण्यांनी केवळ शासकीय आदेश म्हणून नव्हे, तर जबाबदारी म्हणून याची अंमलबजावणी केली

सात कलमी कार्यक्रमामुळे केवळ भौतिक स्वरूपात नव्हे, तर मानसिकतेतही बदल झाला. पोलिस ठाण्यांमध्ये अधिक स्वच्छता, शिस्त आणि नागरिकाभिमुखता निर्माण झाली. अनेक पोलिस ठाण्यांनी आता स्वयंचलित प्रणाली वापरण्यास सुरुवात केली आहे.

प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी राज्यभरातील पोलिस आयुक्तालयांमध्ये मोठी स्पर्धा पाहायला मिळाली. कार्यालयीन स्वच्छता, सेवा वितरणातील गतिशीलता, औद्योगिक संवाद, तक्रार निवारणातील गती, प्रशासनिक पारदर्शकता यावर गुणांकन करण्यात आले.



### पोलिस आयुक्तालयांमध्ये मोठी स्पर्धा

» प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी राज्यभरातील पोलिस आयुक्तालयांमध्ये मोठी स्पर्धा पाहायला मिळाली. कार्यालयीन स्वच्छता, सेवा वितरणातील गतिशीलता, औद्योगिक संवाद, तक्रार निवारणातील गती, प्रशासनिक पारदर्शकता यावर गुणांकन करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेमुळे संपूर्ण राज्यातील पोलिस ठाणी कात टाकत चकाचक झाल्याचे दिसून येत आहे.

### नागरिकांकडून समाधान

पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सात कलमी कृती आराखडाअंतर्गत आघाडी घेत संपूर्ण पोलिस प्रशासनात बदल घडवून आणला. वर्षानुवर्षे पोलिस ठाण्यांत पडून असलेली अडगळ, भंगार जुनी वाहने हटवली गेली. जुन्या कागदपत्रांचे डिजिटायझेशन, नोंदींचे वर्गीकरण, कार्यालयांचे सुशोभीकरण करण्यात आले. नागरिकांसाठी स्वागतकक्ष, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, आणि मार्गदर्शन फलक यांसारख्या मूलभूत सुविधांची निर्मिती करण्यात आली. यामुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### स्वयंचलित प्रणालीचा वापर

सात कलमी कार्यक्रमामुळे केवळ भौतिक स्वरूपात नव्हे, तर मानसिकतेतही बदल झाला. पोलिस ठाण्यांमध्ये अधिक स्वच्छता, शिस्त आणि नागरिकाभिमुखता निर्माण झाली. अनेक पोलिस ठाण्यांनी आता स्वयंचलित प्रणाली वापरण्यास सुरुवात केली आहे. ऑनलाईन तक्रार नोंदणी, तत्काळ प्रतिसाद आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून थेट फॉलोअपची यंत्रणा कार्यान्वित झाली आहे.

### पिंपरी-चिंचवडच्या प्रयत्नांची दखल

» राज्यस्तरीय स्पर्धेत मात्र पिंपरी-चिंचवडला यश हुलकावणी देऊन गेले असले तरीही आयुक्तालयात झालेल्या सकारात्मक बदलांची दखल राज्यस्तरावर घेतली गेली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कार्यालये आणि पोलिस ठाण्यांनी केवळ शासकीय आदेश म्हणून नव्हे, तर जबाबदारी म्हणून याची अंमलबजावणी केली. त्यामुळे नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, आगामी काळात अशा उपक्रमांची नियमित पुनरावृत्ती व्हावी, अशी मागणी होत आहे.

### मुदत संपली, गुणांकन जाहीर

» मागील महिन्यात सात कलमी कार्यक्रमाची मुदत संपली. त्यानंतर भारतीय गुणवत्ता परिषदेने राज्यातील सर्व पोलिस आयुक्तालयांचे मूल्यांकन केले. त्यामध्ये मीरा-भाईंदर पोलिस आयुक्तालयाने प्रथम क्रमांक पटकावला, तर ठाणे आयुक्तालय दुसऱ्या आणि मुंबई रेल्वे पोलिस आयुक्तालय तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

---

# पर्यटनासाठी हॉटेल बुक करताय, सावधान..!; सायबर पोलिसांकडून सावधतेचा इशारा

## बनावट वेबसाईटस् तयार करून ऑनलाईन बुकिंगच्या माध्यमातून पर्यटकांची फसवणूक सुरु आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

गोवा, मनाली, केरळ... यावर्षी उन्हाळ्यात कुठेतरी निवांत फिरायला जायचंय, असा प्लान आखणाऱ्या पर्यटकांना सायबर चोरट्यांनी लक्ष्य केले आहे. नामांकित हॉटेल्सच्या हुबेहूब बनावट वेबसाईटस् तयार करून ऑनलाईन बुकिंगच्या माध्यमातून पर्यटकांची फसवणूक सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.



पिंपरी-चिंचवडमधील वाकड येथील एका कुटुंबाने लोणावळ्यातील प्रसिद्ध रिसॉर्टमध्ये राहण्याची योजना आखली. इंटरनेटवर हॉटेल शोधताना त्यांच्या नजरेस आलेली अधिकृत वाटणारी वेबसाईट उघडून त्यांनी बुकिंग केले. त्यावर दिलेला QR कोड स्कॅन करून त्यांनी 75 हजार रुपयांचे ॲडव्हान्स पेमेंट केले. काही वेळातच त्यांच्या मोबाईलवर 'बुकिंग कन्फर्म' असा मेसेजही आला; मात्र प्रत्यक्षात त्या हॉटेलमध्ये त्यांच्या नावाची कोणतीही नोंद नव्हती. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कुटुंब हादरले.

हॉटेलचे नाव, फोटो, अगदी QR कोडही प्रोफेशनल वाटले. पेमेंटनंतर बँकिंग ॲपमध्ये सुद्धा हॉटेलचेच नाव दिसल्यामुळे आम्हांला विश्वास बसला. पण सगळे बनावट निघाले, अशी खिन्न प्रतिक्रिया पीडित तरुणाने सायबर पोलिसांकडे तक्रार देताना दिली.\

राज्यभरातून अशा प्रकारच्या फसवणुकीच्या अनेक घटना समोर येत असून अनेक नागरिक जाळ्यात सापडले आहेत. ही गुन्हेगारी साखळी केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सध्या सायबर विभाग या वेबसाईटस्चा तांत्रिक माग काढत असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### हुबेहूब मात्र, नकली वेबसाईटस्

» सायबर चोरट्यांनी देशातील अनेक नामवंत हॉटेल्सच्या अधिकृत वेबसाईट्सची हुबेहूब नक्कल करून बनावट वेबसाईटस् तयार केल्या आहेत. हॉटेल्या नावात एखाद्या स्पेलिंगचा किरकोळ बदल करून, जसे की ' Tajhotels. com' ऐवजी 'Tajhotell. com' अशी फसवणूक केली जाते. या बनावट वेबसाईटस्वर आकर्षक फोटो, सवलतीच्या ऑफर्स आणि तांत्रिकदृष्ट्या विश्वासार्ह वाटणारे ठग स्कॅनरही देण्यात येतात. स्कॅन केल्यानंतर जी पेमेंट लिंक उघडते, त्यामध्येही हॉटेलचेच नाव दिसते. त्यामुळे सामान्य ग्राहकाला ही फसवणूक लक्षात येत नाही.

# पुरंदर विमानतळ परिसरात जमीन विक्रीचे बोगस रॅकेट

## मागील काही महिन्यांपासून या ठिकाणी विमानतळ परिसरातील गावांत बोगस दस्तनोंदणीचे प्रकार उघडकीस आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे जमिनीला सोन्याचा भाव आला आहे. मागील काही महिन्यांपासून या ठिकाणी विमानतळ परिसरातील गावांत बोगस दस्तनोंदणीचे प्रकार उघडकीस आले आहेत. वकील, एजंट आणि बनावट वारसदारांचा सुळसुळाट झाला आहे.

पुरंदर तालुक्यात बोगस सातबारांची शासनदरबारी नोंद कशी होते? याचा प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडला आहे. बनावट कागदपत्रांव्दारे नव्या खरेदीदाराचे नाव सातबारा उतार्‍यावर लावण्याचे प्रताप दलालांनी शासकीय यंत्रणा हाताशी धरून केल्याचे उजेडात आले आहे. पुरंदर तालुक्यातील विमानतळ होत असलेल्या गावांत हे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे.

कमी किमतीत भूखंड विकत घेण्याच्या ऑफर्स गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी दिल्या जात आहेत. 10 लाखांपासून ते करोडो रुपयांपर्यंत भूखंडाची ऑफर दिल्याने नवीन गुंतवणूकदार त्यात फसत आहेत. चक्क शासकीय अधिकार्‍यालाच फसविण्याचा प्रकार पुरंदर तालुक्यात घडल्याचे वास्तव समोर आले आहे. कमी किमतीत खरेदीदारांना भूखंड देऊन त्यांची फसवणूक केली जात आहे. गुंतवणूकदारांनी सावधानता बाळगणे गरजेचे आहे.

बहुप्रतीक्षित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला पुन्हा गती मिळाल्याने या भागातील जमिनींच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. प्रकल्पासाठी निर्धारित करण्यात आलेल्या परिसरातील जमिनींना सध्या विक्रीसाठी मोठी मागणी असून, स्थानिक शेतकरी आणि गुंतवणूकदारांमध्ये उत्सुकता वाढली आहे. संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे 2700 हेक्टर जमीन आवश्यक असून, सध्या जमिनी संपादन प्रक्रियेला चालना देण्यात येत आहे. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार असून, राज्य सरकारने नुकतीच यास मान्यता दिली आहे.

शासनाकडून जमिनीचा मोबदला वाढविण्याची तयारी दर्शविण्यात आली आहे. याअंतर्गत जमिनीच्या बाजारभावाच्या चारपट दराने भरपाई देण्याचा प्रस्ताव समोर आला आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आता जमीन देण्यास सकारात्मक दिसत आहेत. स्थानिक नागरिकांच्या प्रतिक्रियेपूर्वी आम्ही या प्रकल्पाला विरोध केला होता, पण, आता भरपाईचा दर आणि रोजगाराच्या संधीमुळे आम्हाला विश्वास वाटतोय, असे एक स्थानिक शेतकरी सांगतात.



### काय काळजी घ्यावी...

- जमीन खरेदीपूर्वी 7/12, 8-अ, फेरफार, घरफार, सिटी सर्व्हे, प्रॉपर्टी कार्ड यांची खातरजमा करावी
- तालुका कार्यालय व महसूल विभागात कागदपत्रांची छाननी करावी
- वकिलांमार्फत टायटल क्लीअरन्स रिपोर्ट घ्यावा
- जमीन विकत घेण्याआधी ॲडव्होकेट किंवा प्रॉपर्टी कन्सल्टंटकडून सखोल चौकशी करावी
- ई-गव्हर्नन्स पोर्टल्स (जसे की महाराष्ट्राचे महाभूलेख) वरून डिजिटल नोंद तपासावी
- व्यवहार करताना नोंदणीकृत दस्तऐवज व पॅन/आधार तपशील बघावे

### अशी होते फसवणूक...

- बनावट 7/12 उतारे व मालकी हक्क दाखविणे जिथे जमीन खरोखर त्यांच्या नावे नसते, पण बनावट कागदपत्रांनी ती आपली भासवतात
- मृत व्यक्तींच्या नावे जमीन विकणे मृत व्यक्तीच्या नावावरील जमीन त्याच्या वारसदारांची परवानगी न घेता विकली जाते
- एकाच जमिनीचे अनेक व्यवहार
- वाहनचालकांचे एका जमिनीची एकाच वेळी किंवा वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या व्यक्तींना विक्री केली जाते
- सरकारी किंवा वादग्रस्त जमीन विकणे
- वाहनचालकांचे अशी जमीन विकत घेतल्यावर खरेदीदार अडचणीत येतो, कारण ती मालकी स्पष्ट नसते
- बनावट खाते व बनावट वारस तयार करणे वारसा हक्काच्या खोट्या कागदपत्रांची निर्मिती करून जमीन विकणे

> पुरंदर विमानतळ परिसरातील सात गावांमध्ये मागील काही दिवसांपासून बोगस दस्तनोंदणी करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बाहेरील शहरातील नागरिक जमिनी खरेदी करण्यासाठी या ठिकाणी येत आहेत. या वेळी त्यांची फसवणूक होत आहे. कोणाचाही प्लॉट कोणालाही विकला जात असल्याची प्रकरणे उघडकीस आली आहेत. चुकीचे खरेदीखत करणार्‍या अधिकार्‍यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत.
>
> **- रोहन सुरवसे पाटील, माहिती अधिकार कार्यकर्ते**

# भविष्यात बंदनलिकेतूनच पाणी देण्याचा प्रयत्न

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील : कोळवाडी येथे योजनेचा शुभारंभ

**पुणे | प्रतिनिधी**

बंद पाइपमधून पाण्याची 30 ते 35 टक्के बचत होत आहे. मात्र, चार्‍यामधून पाणी देऊ लागलो तर पाणी कोणालाच मिळणार नाही. त्यामुळे भविष्यात बंद नलिकेतून पाणी देण्याचा प्रयत्न राहणार राहणार आहे. तसेच तालुक्यात असलेल्या अष्टविनायकांपैकी ओझर या ठिकाणी नौका नयन प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात अधिकार्‍यांची लवकरच बैठक घेऊ, असे आश्वासन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

चिल्हेवाडी धरणाच्या बंदिस्त पाइपलाइन पाणीपूजन सोहळा कोळवाडी (ता. जुन्नर) येथे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार शरद सोनवणे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गणेश, आशा बुचके, अनंतराव चौगुले, प्रसन्न बुचक, डोके, अमोल शिंदे, अशोक घोडके जिवन शिंदे, संतोष सांगळे, आतिषा कु-हाडे, संजय गाढवे, नवनाथ निमसे, दिनेश सहाणे, संतोष पाडेकर, पंकज कणसे, सचिन वाळुंज, प्रदिप देवकर, संजय गुंजाळ, निलेश भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार सोनवणे म्हणाले की, चिल्हेवाडी हे मध्यम प्रकल्पाचे धरण असून या धरणाची साठवण क्षमता एक अब्ज घनफूट (एक टीएमसी) एवढी आहे. या धरणाचे काम 2000 मध्ये पूर्ण झाले आहे. बंद पाइपलाइन कामासाठी पहिल्यांदा 2010 मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर हे काम अंतिम टप्प्यात आहे.



### काम लवकर पूर्ण करा

- चिल्हेवाडी जलवाहिनीच्या कामासाठी राज्य शासनाने निधी उपलब्ध करून दिला असून हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशा सूचना संबंधित खात्याच्या अधिकार्‍यांना राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी दिल्या. कोळवाडी (ता. जुन्नर) : चिल्हेवाडी बंदिस्त पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी आमदार शरद सोनवणे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

तालुक्याच्या पूर्व भागातील चिल्हेवाडी, पाचघरवाडी, आंबेगव्हाण, रोहकडी, ओतूर, डुंबरवाडी, खामुंडी, गायमुखवाडी, पिपरी पेंढार, वडगाव आनंद, जांभुळपट, नवलेवाडी, आळेफाटा, आळे, कोळवाडी, लवणवाडी, राजुरी, गुंजाळ वाडी, बेल्हे, बांगरवाडी या 21 गावांना बंदिस्त नलिकेच्या माध्यमातून सिंचनासाठी पाणी देण्यात येणार आहे. यामुळे पूर्व भागातील 7 हजार 697 हेक्टरमधील जमिनी सिंचनाखाली येणार असल्याने हा परीसर सुजलाम् सुफलाम् होणार आहे, त्यामुळे हे काम लवकर पूर्ण करावे अशी आग्रही मागणी आमदार सोनवणे यांनी मंत्री विखे यांच्याकडे केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गुंजाळ यांनी केले.